# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.12.2024** **वार–शुक्रवार**

---

**पुस्तक महोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या संध्याकाळी होणार आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार चंद्रकांत पाटील, यांच्यासह नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, कार्यक्रमाचे संयोजक राजेश पांडे यांची मुख्य उपस्थिती असेल.

**कॉन्फरन्स**

पुण्यातल्या डी आय एटी अर्थात प्रगत तंत्रज्ञान संरक्षण संस्थेने आजपासून पुणे-कॉन-2024 या जागतिक परिषदेचं आयोजन केलं आहे. ‘शाश्वत-सुरक्षित डिजिटल परिवर्तन’ या संकल्पनेवर आधारित ही परिषद 15 तारखेपर्यंत चालणार आहे. यामध्ये भारतासह विविध देशातील प्रख्यात शिक्षणतज्ञ, संशोधक, तंत्रज्ञ, उद्योजक आणि धोरणकर्ते - महत्त्वाच्या डिजिटल समस्या आणि नाविन्यपूर्ण उपायांवर चर्चा करतील. आजच्या उद्घाटन सत्रादरम्यान DIAT आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, यांच्यात शैक्षणिक सहकार्यासाठी सामंजस्य करारही करण्यात आला.

**यशदा**

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी अर्थात यशदा मार्फत यूपीएससी उत्तीर्ण अधिकाऱ्यांसाठी विशेष शिबीर, आयोजित करण्यात आलं आहे. या अंतर्गत आज 35 प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पुणे महानगरपालिकेला भेट दिली. यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेन्द्र भोसले यांनी अधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती दिली.

**पीएमपी**

पीएम-पीएमएल च्या काही बस आगारांचं खासगीकरण करण्याच्या प्रस्तावाला शिवसेनेचे पुणे शहरप्रमुख प्रमोद भानगिरे यांनी विरोध केला आहे. हा प्रस्ताव तत्काळ रद्द करावा; अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्या बाबतचं निवेदन त्यांनी 'पीएम पीएमएल 'चे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष, तसंच पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आयुक्तांना दिलं आहे.

**नेत्र तज्ज्ञ परिषद**

पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेची ‘स्पेक्ट्रम 2024’ ही 17 वी वार्षिक परिषद औंधमधील भारतीय विज्ञान संशोधन संस्थेत उद्या आणि परवा होणार असल्याची माहिती पुणे नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्ष डॉ. राधिका परांजपे यांनी दिली. उद्घाटन सोहळ्याला ऑल इंडिया ऑप्थलोमोलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉक्टर  समर बसक आणि डॉक्टर तात्याराव लहाने, उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत नेत्र विज्ञान क्षेत्रातील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन उपाययोजनांवर चर्चा होईल. देश-परदेशातील नेत्र तज्ज्ञ, संशोधक आणि नेत्ररोग क्षेत्रातील व्यावसायिक यात सहभागी होणार आहेत.

**साखर कामगाराचा संप मागे**

वेतनवाढी सह अन्य मागण्यांसाठी राज्यातील दीड लाख साखर कामगारांनी 16 डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला होता; मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून  राज्य सरकारने वेतनवाढीसाठी त्रिपक्षीय समितीची तातडीनं  स्थापना केली आहे. यामुळे राज्यातील साखर कामगारांनी संप दोन महिन्यांसाठी स्थगित केल्याची माहिती - साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांनी दिली. राज्याच्या कामगार विभागानं वेतनवाढीसह अन्य प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तीन घटकांच्या प्रतिनिधींची- त्रिपक्षीय समिती, शासन निर्णयाद्वारे स्थापन केल्याचं काळे यांनी सांगितलं.

**‘ज्ञानऊर्जा’वाचनालय**

महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पुस्तकाच्या रूपानं  नवीन मित्र मिळावेत, वाचन-कला विकसित व्हावी तसंच जीवनाला नवी दिशा मिळावी, या उद्देशाने पुण्यात ‘ज्ञानऊर्जा’ वाचनालय सुरू करण्यात आलं आहे. महावितरणच्या रास्ता पेठ इथल्या प्रशासकीय इमारतीमध्ये हे वाचनालय सुरू करण्यात आलं आहे. याचं उद्घाटन मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांच्या हस्ते झालं. यामध्ये वीजक्षेत्रासह सामाजिक, ऐतिहासिक तसंच  विविध क्षेत्रांतील नामवंत लेखकांची पुस्तकं , कथासंग्रह, कादंबरी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाचनालया  शेजारी विरंगुळा कक्ष असून त्यात कॅरम, बुद्धिबळ खेळण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात आलं आहे. या शिवाय वाहनचालकांसाठी वाहक कक्ष देखील उभारण्यात आला आहे.

**क्रीडा**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीनं 'पीडी एफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं असून या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील चाळीसहून अधिक फुटबॉल क्लबचे 170 संघ आणि सुमारे 2500 खेळाडू सहभागी होणार आहेत. उद्या 14 डिसेंबरपासून या स्पर्धेला सुरूवात होणार आहे. सलग पाच महिने या स्पर्धेचे सामने खेळवण्यात येणार आहेत. ही स्पर्धा 6 विविध वयोगटांमध्ये आणि मुलं आणि मुलींच्या संघात होणार आहे.

**निधन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि राज्य सरकारच्या शिक्षण खात्यातील निवृत्त उपनिबंधक, मधुकर राऊत यांचं पुण्यात नुकतंच वृद्धापकाळाने निधन झालं. ते 95 वर्षांचे होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश मुख्यतः निरभ्र असेल, कमाल तापमान 30 तर किमान तापमान 13 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**